22 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# विद्यापीठ दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा विभागातर्फे विद्यार्थ्यांना 'एसएमएस'पाठविण्याचे काम सुरू आहे.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ तीन दिवसांवर आला आहे. त्याच्या अनुषंगाने कुलगुरू नियुक्त केलेल्या विविध समित्यांचे कामकाज सुरू



शिवाजी विद्यापीठातून

आहे. रंगरंगोटी, मंडप उभारणीसह निमंत्रण पत्रिकांचे वाटप करण्यात येत आहे. ग्रंथ महोत्सव व ग्रंथ दिंडींचे नियोजन सुरू आहे. दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, याची दक्षता घेण्यात आली आहे.

दीक्षांत समारंभासाठी महानगरपालिकेच्या वतीने के.एम.टी.ची विशेष बससेवा देण्यात येणार आहे. शुगरमिल व शिवाजी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2017
लोकमत



## विद्यापीठ 'दीक्षांत'साठी विशेष बससेवा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यासाठी शुक्रवारी (दि. २४) के.एम.टी. उपक्रमांतर्गत विशेष बससेवा सोडण्यात येणार आहे. शुगरमिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरु राहणार आहेत. याशिवाय बाहेरगावांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक नं. १ येथून सकाळी ७ वा. पासून प्रत्येकी १० मिनिटांच्या अंतराने शिवाजी विद्यापीठ येथे जाण्यासाठी बससेवा सुरु असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2017
तरुण भारत

# दीक्षांत समारंभासाठी केएमटीची विशेष बस सेवा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यासाठी केएमटीच्या वतीने विशेष बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभासाठी (दि. २४) शुगरमिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० वाजल्यापासून सुरू राहणार आहे. या बससेवेचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक सायन्स कॉलेज–विनायक बंगला–रेल्वे फाटक–राजारामपुरी–सम्राटनगर किंवा सायबर–शिवाजी विद्यापीठ असा राहील. या सेवेसाठी प्रवाशांना शिवाजी चौक ते विद्यापीठ परिसर ११ रुपये दर आकारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे साळोखेनगर–आपटेनगर–कागल–कणेरीमठ या बसेस शिवाजी विद्यापीठमार्गे धावणार आहेत. बाहेरगावावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक येथून सकाळी ७ वाजल्यापासून प्रत्येक १० मिनिटाला शिवाजी विद्यापीठात जाण्यासाठी बससेवा सुरू केली आहे. सर्व प्रवाशांनी बससेवेचा लाभ घेऊन परिवहन उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

22 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवींचे कर्तृत्व धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नव्हते

## इतिहास अभ्यासक संजय सोनवणी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यान, चरित्रग्रंथ उपलब्ध नसल्याविषयी खंत

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कर्तृत्व हे धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नव्हते. तर मल्हारराव होळकरांची अत्यंत तेजस्वी बुद्धीमान आणि पराक्रमी सून असलेल्या अहिल्यादेवींच्या भालाफेकीतील कौशल्याचे टिपू सुलतानानेही वर्णन केलेले आढळते, असे सांगत मध्ययुगीन भारतातील ती एक युद्धकुशल, स्वतंत्रतावादी, कायदेतज्ज्ञ, रसिक-गुणग्राहक, उद्योगांचे महत्त्व समजणारी अशी असामान्य स्त्री होती' असे प्रतिपादन होळकरांच्या इतिहासाचे अभ्यासक संजय सोनवणी यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संजय सोनवणी यांनी सांगितले की, मध्ययुगीन कालखंडात स्त्रीयांचे जीवन रूढी - परंपराच्या चौकटीमध्ये बांधले गेलेले होते. स्त्रियांचे नखदेखील कुणाला दिसू नये, इतके त्यांना 'पडदानशीन' केले गेलेले होते. पण त्याच काळात परंपरेची बंधने झुगारून देणारी



व्याख्यानात बोलताना इतिहासाचे अभ्यासक संजय सोनवणी.

आणि प्रसंगी सनातन्यांचा रोष ओढवून घेणारी अहिल्यादेवीही आपल्याला दिसते. जी खरे तर स्वत: एका वंचित समाजातली स्त्री. परंतू केवळ आत्मविश्वास आणि धडाडीच्या जोरावर अहिल्यादेवींनी स्वत:ला मिळालेल्या संधीचे सोने केले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, आपल्या राज्यात विधवांना दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार देणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे स्वतंत्र सैनिक प्रशिक्षण केंद्र काढणे व स्त्रियांची बटालियन स्थापन करणे किंवा महिला विणकरांना प्रोत्साहन देणे, एका अर्थाने वस्त्रोद्योग व्यवसायाचा पाया घालणे, यासारखी त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेली कामे ही त्यांची दूरदृष्टी आणि कर्तृत्व याची साक्ष देतात. वंचित समाजात जन्माला येऊनही, वंचिततेवर मात करून वंचित समूहांसाठी कार्य केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांवर आजही अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही, अशीही खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी तर प्रा. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. निलिशा देसाई यांनी आभार मानले. व्याख्यानासाठी प्रा. कोळेकर, डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. चांगदेव बंडगर, रावसाहेब पुजारी, दशरथ पारेकर, अमोल पांढरे यांच्यासह विद्यार्थीवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी किशोर खिलारे, शरद पाटील, श्रीधर साळोखे यांनी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2017
पुढारी

# करिअरसाठी जगाच्या स्पर्धेत सहभागी व्हा : डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी करिअर घडविण्यासाठी जोखीम स्वीकारून जगातील स्पर्धेत सहभागी व्हावे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.


शिवाजी विद्यापीठ एम.बी.ए. अधिविभागात आयोजित 'सिंहावलोकन-२०१७' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. नांदवडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी कोणत्याही स्पर्धेला न घाबरता त्यांच्यातील नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव द्यावा. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव, नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ मिळावे, यासाठी एम.बी.ए. भाग-१ व २ च्या विद्यार्थ्यांसाठी सिंहावलोकन स्पर्धा घेण्यात आली. अॅड अस्त्रा, स्टार्ट अप प्लॅन, बिझनेस क्वीझ, मॉक रिक्रूटमेंट, बेस्ट सेल्स एक्झिक्युटिव्ह, केस स्टडी या स्पर्धा झाल्या.

एम.बी.ए.चे संचालक डॉ.एच. एम. ठकार यांनी स्पर्धेविषयी माहिती दिली. यावेळी बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक अनंत घाटे, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव, विकी चावला आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी गंधाली खारगे, स्मिता कांबळे, संकेत रावण यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2017
लोकमत

# भाषा दिनानिमित्त सोमवारी 'मराठी अमुचि मायबोली'

कोल्हापूर : मराठी भाषा गौरवदिनानिमित्त उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि विद्यापीठातर्फे राज्यभर महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत सोमवारी (दि. २७) सायंकाळी ६ वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात शिवाजी विद्यापीठातर्फे व रुद्र थिएटर्स मुंबईची निर्मिती असलेल्या 'मराठी अमुचि मायबोली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात




आले आहे तसेच शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मुंबई येथे मराठी भाषेच्या गौरवार्थ व भाषा विकासासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. (प्रतिनिधी)